Reg. No. NPCITY/236/2018-20

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक २] गुरूवार, फेब्रुवारी २७, २०२०/फाल्गुन ८, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २.

**उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक-कार्या-उविअ-कलि-भूसंपादन-काकवि-१९८-२०२०.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम ३ मधील पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने महसूल व वन विभाग अधिसूचना क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र. क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यानंतर यापुढे याला “ सदहुं अधिसूचना ” संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करतांना [सदहुं कायद्याच्या कलम ३ मधील पोट-कलम (झेड-ए)] नुसार जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा जास्त नसलेल्या जमिनीच्या बाबतीत त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांना या कायद्याअंतर्गत जमीन संपादन करण्यास शासनाच्यावतीने ‘समुचित शासन’ म्हणून घोषित करण्यात आले असल्यामुळे मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे आदेश क्रमांक कार्या-८-अ.का-भूसंपादन-काकवि-३३५-२०१५, दिनांक २९ जून, २०१५ अन्वये उपविभागीय अधिकारी, कुरखेडा यांना उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, कुरखेडा म्हणून घोषित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी, कुरखेडा यांना जिल्हाधिकारी यांचेवतीने उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, कुरखेडा म्हणून घोषित करण्यात आले आहे, त्याअर्थी, अनुसूची-एकमध्ये दर्शविलेल्या जमिनी ( यापुढे याचा “ उक्त भूमी ” असा उल्लेख करण्यात येईल) अनुसूची दोनमध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरीता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे.(यापुढे याचा उल्लेख “ उक्त सार्वजनिक प्रयोजन ” असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी, गडचिरोली यांची समुचित शासन म्हणून खात्री झाल्यामुळे सदहूं कायद्याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) नुसार सार्वजनिक कामाचे प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते, असे अधिसूचित करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, सदहुं भूमि संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमि संपादित करतांना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये नमूद केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, भूमि संपादन कायद्याअंतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भूमि संपादन करतांना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये नमूद केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, या भूमि संपादन कायद्याचे कलम ४३ च्या पोट-कलम (१) नुसार विस्थापितांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्याकरीता सोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये प्रशासकाचे विवरण नमूद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती करणे आवश्यक असल्यास अनुसूची-पाचमध्ये माहिती देणे आवश्यक आहे);

त्याअर्थी, सदहू कायद्याच्या कलम ११ चे पोट-कलम (४) नुसार अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सदहू भूमि कायद्याच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही :

परंतु, जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या भूमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट-कलमाच्या अंमलबजावणी मधून अशा भूमी मालकास सूट देऊ शकेल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतीची जिल्हाधिकारीद्वारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदहू भूमि संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ ( यापुढे ज्यांचा उल्लेख " उक्त नियम " असा करण्यात येईल) चे नियम १० उप-नियम (३) अन्वये भूमि अभिलेख अद्ययावत करण्याचे काम हाती घेतील.

आणि म्हणून, त्याअर्थी, समुचित शासन म्हणून जिल्हाधिकारी, सदहू कायद्याचे कलम ३ चे पोट-कलम (ग) अन्वये उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, कुरखेडा यांना जिल्हाधिकारी यांना कतव्ये पार पाडण्यास प्राधिकृत करीत आहे.

**अनुसूची-एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-२०१९-२०२०,

गावाचे नाव येंगलखेडा, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, प.ह.नं.९.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १९० | ० ०९ |
| २ | २०६ | ० २६ |
| ३ | १४ | ० ३८ |
| ४ | २०५ | ० ११ |
| ५ | २०८ | ० ४२ |
| ६ | १ | ० २५ |
| ७ | ७ | ० ३३ |
| ८ | १९२ | ० ०६ |
| ९ | ३ | ० ०१ |
| १० | १३८ | ० ००५ |
| ११ | १३९ | ० २४ |
| १२ | १४२ | ० ०९ |
| | एकूण . . | २ २४५ |

**अनुसूची-एक-**चालू

गावाचे नाव चिचेवाडा, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, प.ह.नं.१०

| अनुक्रमांक | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १८८ | ० २६ |
| २ | ५/१ | |
| ३ | ५/२ | ० ५० |
| ४ | ५/३ | |
| ५ | १६४ | ० ११ |
| | एकूण . . | ० ८७ |

गावाचे नाव सावरगाव, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, प.ह.नं. ९

| अनुक्रमांक | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १३६/२ | ० ६४ |
| २ | १३२ | ० ४६ |
| ३ | ३२/ब | ० ११ |
| | एकूण . . | १ २१ |

गावाचे नाव नेहारपायली, तालुका कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, प.ह.नं.१३

| अनुक्रमांक | सर्व्हे क्रमांक किंवा गटक्रमांक | संपादनाखालील क्षेत्र अदमासे |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १५ | ० १९ |
| २ | ७८ | ० १४ |
| ३ | ५९ | ० १४ |
| | एकूण . . | ० ४७ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | येंगलखेडा लघु पाटबंधारे प्रकल्प. |
| प्रकल्प कामाचे विवरण | :— | येंगलखेडा लघु पाटबंधारे प्रकल्पाअंतर्गत उजव्या कालव्याचे बांधकामाकरीता. |
| प्रकल्पाचे समाजाला होणारे फायदे (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा व इतर) | :— | या प्रकल्पामुळे मौजा येंगलखेडा, नेहारपायली, सावरगांव व चिचेवाडा येथील एकूण ५१५.०० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून त्याचा फायदा शेतक-यांना होईल. |

## अनुसूची-तीन

### प्रकल्प बाधितांना विस्थापित करणे आवश्यक असल्याबाबतची कारणे

संपादनामुळे भूधारक विस्थापित होत नाही.–निरंक.

## अनुसूची-चार

### सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश

पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक F. No. 8-26/2001-FC, दिनांक जुलै २००८ अन्वये प्रकल्पास पर्यावरण विभागाचे नाहरकत मिळालेले असल्याने नवीन भूसंपादन कायदा, २०१३ कलम (६) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे.

## अनुसूची-पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) अधिका-यांचे नाव व पदनाम–निरंक.

(आ) अधिका-याचा कार्यालयीन पत्ता–निरंक.

(इ) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसूचनेचे विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापुर्वी भरावे) –निरंक.

**विशेष नोंद**-(१) भूसंपादित जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, कुरखेडा यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

(२) याबाबत काही आक्षेप असल्यास या कार्यालयाचे समक्ष लेखी आक्षेप अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांचे आत सादर करावे.

**विशालकुमार मेश्राम,**
उपविभागीय अधिकारी
तथा विशेष भूसंपादन अधिकारी,
कुरखेडा.

कुरखेडा :
दिनांक २० फेब्रुवारी २०२०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE,